PC 5 D:/Regular-17/roshan new shelar/Circular (Pra)

# मुंबई विद्यापीठ

स्मरणपत्र—२

**No. Aff./ICC/ (2019-20)/29 / of 2020**

परिपत्रक:

विषय:— मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडया इत्यादींचे तपासणी करण्याबाबत..

संदर्भ:— १) विद्यापीठाचे दिनांक २३ मे,२०१९ रोजीचे परिपत्रक.
२) विद्यापीठाचे दिनांक ०२ नोव्हेंबर,२०१९ रोजीचे परिपत्रक.
३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अ. शा. पत्र क्र. संकीर्ण—२०१८/ प्र. क्र. ७१/विशि—३ दिनांक ०२ जानेवारी, २०२० रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/ परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, तुकडया इत्यांदीचे शैक्षणिक ऑडिट करणे आवश्यक असल्यामुळे ज्या महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे अद्यापर्यत अहवाल सादर केला नसेल अशा महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, खालील दिलेल्या तक्त्यामध्ये **"शैक्षणिक ऑडिट अहवाल"** ची माहिती उपकुलसचिवांचे दालन, संलग्नता/ मान्यता विभाग, कक्ष क्र. २०६, दुसरा माळा, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२ येथे **तात्काळ** सादर करण्यात यावा.

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | महाविद्यालयाचे नाव व पत्ता, स्थापन वर्ष | अभ्यासक्रमाचे नाव व प्रवेश क्षमता | अतिरिक्त तुकडी | नविन विषय | नविन विद्याशाखा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

(डॉ अजय देशमुख)
कुलसचिव

मुंबई—४०० ०३२
28 जानेवारी, २०२०

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

15/1/2020

VC/ICD/2019-20/2104

# महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

सौरभ विजय, भा.प्र.से
सचिव

अ.शा.पत्र.क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र-७१/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
411 मंत्रालय विस्तार,हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - 400032.
दूरध्वनी: 022-22025301
ईमेल: psec.higheredu@maharashtra.gov.in
दिनांक : २ जानेवारी, २०२०.

AR
gone status
24/01

विषयः मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडया इत्यादींचे शैक्षणिक ऑडीट करण्यासंदर्भात मा.राज्यपाल महोदय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने.....

संदर्भ: विभागाचे समक्रमांकाचे दि.१२.१०.२०१८ रोजीचे शासन शुध्दीपत्रक.

प्रिय डॉ. पेडणेकर,

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/ परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विद्याशाखा, विषय, तुकडया इत्यादींचे त्रयस्थ व्यवस्थेमार्फत ऑडीट करण्याबाबतचा निर्णय संदर्भाधीन शासन शुध्दीपत्रकान्वये घेण्यात आला आहे. यासंदर्भात दि.१६.१०.२०१९ रोजी आढावा बैठक घेण्यात आली असता सदर बैठकीत शैक्षणिक ऑडीट एका महिन्यात पूर्ण करण्याचे विद्यापीठाच्या कुलसचिवांनी आश्वासन दिले होते.

मा. राज्यपाल महोदय यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीत विद्यापीठाने शैक्षणिक ऑडिट अपूर्ण असल्याचे आढळून आले आहे. त्यास अनुसरुन मा. राज्यपाल महोदय यांनी मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/ परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विद्याशाखा, विषय, तुकडया इत्यादींचे शैक्षणिक ऑडीट ऑनलाईन प्रणालीवर दिनांक १५ जानेवारी, २०२० पर्यत कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच शैक्षणिक ऑडीट करण्याकरिता तयार केलेली ऑनलाईन प्रणाली (Software) इतर सर्व अकृषी विद्यापीठांशी सामायिक (Share) करण्याचे निर्देश दिले आहेत.

उपरोक्तप्रमाणे शैक्षणिक ऑडीट ऑनलाईन प्रणालीवर दिनांक १५ जानेवारी, २०२० पर्यत कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करण्याकरिता आपण व्यक्तिशः लक्ष घालून आपण त्वरीत कार्यवाही केल्यास मी आपला आभारी राहीन. तसेच शैक्षणिक ऑडीट करण्याकरिता तयार केलेली ऑनलाईन प्रणाली (Software) इतर सर्व अकृषी विद्यापीठांशी सामायिक (Share) करण्यात यावी जेणे करुन सदर विद्यापीठे देखील समान पध्दतीने शैक्षणिक ऑडीट करु शकतील.

शुभेच्छासह,

आपला स्नेहांकित,
(सौरभ विजय)

HOD(IT)
DR(Affiliation)
AR(CAPD)
PRO V.C
PVC, Registrar
Urgent
PVC, R
08/01/20

प्रति,
डॉ. प्रा.सुहास पेडणेकर,
कुलगुरु, मुंबई विद्यापीठ,
मुंबई ४०० ०२३.

कृ.मा.प.

VC

प्रत:-

१) मा. कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.

२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १२ ऑक्टोंबर, २०१९ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकाव्दारे गठीत केलेल्या कार्यबल गटाचे (Task Force ) सदस्य सचिव म्हणून प्रस्तुत शासन शुध्दीपत्रकात नमूद केल्याप्रमाणे मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडया इत्यादींचे शैक्षणिक ऑडीट करण्याकरिता वेळोवेळी तपासणी करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.